ePaper

## बाळासाहेबांनी उद्धव यांना मुख्यमंत्री केलेच नसते! : एकनाथ शिंदे



| वर्ष - 7 | अंक - 328 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 19 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- यश ठरला आरसीबीचा तारणहार!
- अदाने नेसली चक्क १५ रुपयांची साडी
- तुम्ही जेल-जेलचा खेळ खेळताय!
- पेन्शनधारकांचा महागाई भत्ता वाढणार!

## प्रचंड उकाड्यानंतर पावसाला सुरुवात

# पुणेकरांना जलधारांनी दिलासा!

### हवामानामध्ये बदल : अंदमानमध्ये मान्सून दाखल

| पुणे | महाईन्यूज

**सकाळपासून प्रचंड उकाडा सहन करणाऱ्या पुणेकरांना सायंकाळी जलधारांनी दिलासा दिला. दुपारी दमट वातावरणामुळे अंगातून घाम निघत होता, त्यानंतर सायंकाळी ५ वाजता ढगांची गर्दी झाली आणि पावसाने हजेरी लावली. गेल्या तीन चार दिवसांपासून मॉन्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे.**

राज्यासह पुण्यात देखील पावसाची हजेरी लागत आहे. शहरात अनेक ठिकाणी पाऊस होत असून गुरूवार पेठेत एका ठिकाणी झाड देखील पडले आहे. हलक्या ते मध्यम सरी कोसळत असून, पुणेकरांची चांगलीच धांदल उडत आहे.

मॉन्सूनचे आगमन उद्या रविवारी अंदमानात होत आहे. तर केरळमध्ये ३१ मे रोजी दाखल होईल, असा अंदाज हवामान खात्याने दिला आहे. राज्यामध्येही विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात येत्या चार दिवसांमध्ये वादळी वारा आणि विजांचा कडकडाट होईल, असा इशारा देण्यात आला आहे.



## पुणे-सोलापूर हायवेवर होर्डिंग कोसळून दोन जण जखमी



वादळी वाऱ्यासह वळवाचा जोरदार पाऊस पडल्याने पुणे-सोलापूर महामार्गालगतचे होर्डिंग कोसळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती ग्रामपंचायत हद्दीतील कवडीपाट टोलनाक्याजवळ असलेल्या गुलमोहर लॉन्स येथे आज दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या दुर्घटनेत दोघेजण जखमी झाले आहेत. तर एका घोड्याला मार लागला आहे. मात्र, या घटनेत गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गेले काही दिवस होर्डिंगबाबत आवाज उठवला जात आहे. मात्र प्रशासन गांभीर्याने घेत नाही . त्यामुळे आज झालेल्या या घटनेने पुन्हा एकदा अनधिकृत व धोकादायक होर्डिंगचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## अरारा खतरनाक! भोसरीत कोयता गँगचा धुडगूस

### आम्ही इथले भाई आहोत' म्हणत दोघांना कोयत्याने मारहाण

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

जुन्या भांडणातून सहा जणांच्या टोळीने दोघांना कोयत्याने बेदम मारहाण केली. कोयता हवेत फिरवून 'आम्ही इथले भाई आहोत' असे म्हणत परिसरात दहशत निर्माण केली. ही घटना १६ मे रोजी सायंकाळी भोसरीतील चक्रपाणी वसाहतीत घडली.



याप्रकरणी ओंकार मल्हारी दळवी (वय २२, रा.दिघी), योगेश जगन्नाथ मुळे (वय २१), गणेश कृष्णा गवारी ( वय १९, दोघे रा. चक्रपाणी वसाहत, भोसरी), विजय विरेंद्र चव्हाण (वय १८, रा.सद्गुरूनगर, भोसरी) या चौघांना अटक केली आहे. तेजस डोंगरे आणि सचिन येरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विशाल विठ्ठल साळवे (वय १९, रा. भोसरी) याने भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी विशाल हा भोसरीतील देवकर वस्ती येथे थांबला होता. त्यावेळी आरोपी योगेश, विजय तेथे आले. जुन्या भांडणाचा राग मनात धरून विशालसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. योगेशने ओंकारला बोलावून घेतले. आरोपी ओंकार याने हातात कोयता घेऊन तुम्ही आमच्या गँगला दम देता काय असे म्हणत शिवीगाळ केली.

#### लाथाबुक्क्यांनी मारहाण

आरोपींनी विशाल याला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच विशालचा साथीदार लक्ष्मण आखाडे याला पकडून ठेवले. आरोपी ओंकार याने विशालच्या पाठीत आणि लक्ष्मण याच्या डोक्यात कोयता मारून गंभीर जखमी केले. तसेच कोयता हवेत फिरवून मी आताच 'मोक्का'मधून बाहेर आलो आहे, आम्ही इथले भाई आहोत असे म्हणत परिसरात दहशत निर्माण केली. भोसरी पोलीस तपास करीत आहेत.

# पौडफाटा रस्त्यावरून राजकारण तापले

## लोकांच्या म्हणण्यानुसार 'मोजक्या लोकांना' याचा फायदा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बालभारती ते पौड फाटा या संदर्भात भाजपाने स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार 'मोजक्या लोकांना' याचा फायदा व्हावा, या उद्देश्यानेच वेताळ टेकडीवर रस्ता करण्याचा घाट घातला होता. याला मतदारसंघातील मतदारांनी मोठ्या प्रमाणात विरोध केला.**




यावर भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी समंजस भूमिका घेत असल्याचे जाहीर करताना, स्थानिकांची मते पदरात पाडून घेतली. निवडणूक संपताच पुन्हा एकदा हुकूमशाही प्रवृत्ती दाखविताना 'डंके की चोट पर' हा रस्ता करून दाखविणार असे ट्वीट केले. यामुळे मते पदरात पाडून घेण्यासाठी भाजपा किती खालच्या मानसिकतेने काम करतो असे स्पष्ट होत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहरप्रमुख गजानन थरकुडे यांनी केला.भाजपाने गेल्या पाच वर्षात महानगरपालिकेत सत्ता रबविताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला. कोविड काळात तर भाजपाच्या अनेक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी महापालिकेचा, राज्याचा आणि केंद्राचा पैसा आपल्या खिशात टाकला. भाजपाने निवडून आलेल्या ठिकाणी देखील विकास केला नाही. कोथरूड हा बालेकिल्ला असलेल्या भाजपाने कोणताही विकासाचा प्रकल्प पूर्ण केला नाही. मेट्रो प्रकल्प देखील केंद्र आणि राज्य सरकार यांनी मिळून केला होता, मात्र, स्थानिक पदाधिकारी याचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहेत. चांदणी चौक हा तांत्रिकदृष्ट्या बारामती लोकसभा मतदार संघात येतो. यासाठी खासदार सुप्रियाताई सुळे यांनीही प्रयत्न केले होते. त्यामुळे दुसऱ्यांनी केलेल्या कामांचे श्रेय लाटण्याचे काम भाजपने नेहमीच केले आहे. भांडारकर रस्त्यानजीक असणारी वेताळ टेकडी फोडून बालभारती ते पौड फाटा हा रस्ता कारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्यामुळे स्थानिक मतदार नाराज झाला, असे असूनही भाजपाने केवळ निवडणुकीपुरता या विषयावर पडदा टाकला. मात्र, आपली हुकूमशाही पद्धती पुन्हा राबविताना रस्ता करण्याचा प्रयत्न करणार आहेत. अशा पर्यावरणाची हानी पोचविणाऱ्या, भाजपचा आम्ही निषेध करतो. भविष्यात भाजपाने हा रस्ता करण्याचा प्रयत्न केल्यास, याच्या विरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा थरकुडे यांनी दिला.

### टेकडीवर रस्ता करण्याचा घाट

निवडणूक संपताच पुन्हा एकदा हुकूमशाही प्रवृत्ती दाखविताना 'डंके की चोट पर' हा रस्ता करून दाखविणार असे ट्वीट केले. यामुळे मते पदरात पाडून घेण्यासाठी भाजपा किती खालच्या मानसिकतेने काम करतो असे स्पष्ट होत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहरप्रमुख गजानन थरकुडे यांनी केला.भाजपाने गेल्या पाच वर्षात महानगरपालिकेत सत्ता रबविताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला. कोविड काळात तर भाजपाच्या अनेक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी महापालिकेचा, राज्याचा आणि केंद्राचा पैसा आपल्या खिशात टाकला. भाजपाने निवडून आलेल्या ठिकाणी देखील विकास केला नाही. कोथरूड हा बालेकिल्ला असलेल्या भाजपाने कोणताही विकासाचा प्रकल्प पूर्ण केला नाही. मेट्रो प्रकल्प देखील केंद्र आणि राज्य सरकार यांनी मिळून केला होता, मात्र, स्थानिक पदाधिकारी याचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहेत. चांदणी चौक हा तांत्रिकदृष्ट्या बारामती लोकसभा मतदार संघात येतो. यासाठी खासदार सुप्रियाताई सुळे यांनीही प्रयत्न केले होते.

# राज्यात आठ दिवस पावसाचा मुक्काम!

## राजस्थानपासून उत्तर मध्य महाराष्ट्रापर्यंत द्रोणीय स्थिती कार्यरत

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात गेल्या आठ ते दहा दिवसांपासून सुरू असलेला अवकाळी पावसाचा मुक्काम आणखी वाढणार आहे. शुक्रवारपर्यंत (२४ मे) मराठवाडा, विदर्भात सर्वात अधिक अवकाळी पाऊस पडणार असून, मध्य महाराष्ट्रातील काही भागात गारपीट, तर कोकणात गरमी आणि आर्द्रता वाढणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.**



ईशान्य राजस्थानपासून उत्तर मध्य महाराष्ट्रापर्यंत द्रोणीय स्थिती कार्यरत असून, त्याची तीव्रता कायम आहे. याशिवाय मराठवाडा ते तामिळनाडूपर्यंत (कर्नाटक पार करून ) द्रोणीय स्थिती असून, त्याचा प्रभाव वाढला आहे. या स्थितीमुळे राज्यातील विदर्भ आणि मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांना हवामान विभागाने 'यलो अलर्ट' दिला आहे. या भागात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहणार असून, विजांचा कडकडाट, मेघगर्जनेसह जोरदार पाऊस हजेरी लावणार आहे. राज्यातील कमाल तापमानात घट झाली आहे. तरीदेखील उकाडा आणि उष्णतेच्या झळा कायम आहेत. राज्यात शनिवारी जळगाव येथे सर्वाधिक ४३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मुंबई, पालघर, ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या भागात पुढील तीन दिवस उष्णतेची लाट आणि आर्द्रता कायम राहणार आहे. मात्र, या भागात दुपारनंतर पावसाच्या हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील अवकाळी पाऊस कमी झाला आहे. मात्र, पुढील दोन दिवसांत या भागातील काही जिल्ह्यांत गारपीट होण्याची शक्यता आहे किंवा तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असाही अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. राज्यात गेल्या आठ ते दहा दिवसांपासून अवकाळी सुरू असल्यामुळे बहुतांश भागातील कमाल तापमान ४० अंशांच्या खाली आले आहे. तरीदेखील दुपारपर्यंत कडक ऊन, दुपारनंतर पावसाची हजेरी, तर रात्रभर उकाडा अशी स्थिती कायम आहे. नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, बुलडाणा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ – (२४ मेपर्यंत), तर जळगाव, पालघर, ठाणे, मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, नगर, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, बीड, लातूर, हिंगोली (पुढील दोन दिवस) मोसमी वाऱ्यांना अनुकूल स्थिती अनुकूल स्थितीमुळे मोसमी वारे येत्या ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्रासह निकोबार बेटे, तसेच बंगालच्या उपसागरातील वायव्य बेटांवर दाखल होतील, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. वायव्य बंगालच्या उपसागरात २२ मे रोजी कमी दाबाचा पट्टा तयार होणार आहे, तर २४ मे रोजी बंगालच्या उपसागरातील याच कमी दाबाचे रूपांतर तीव्र कमी दाबाच्या पट्ट्यात होणार आहे.

### पाऊस जोरदार हजेरी लावणार

ईशान्य राजस्थानपासून उत्तर मध्य महाराष्ट्रापर्यंत द्रोणीय स्थिती कार्यरत असून, त्याची तीव्रता कायम आहे. याशिवाय मराठवाडा ते तामिळनाडूपर्यंत (कर्नाटक पार करून ) द्रोणीय स्थिती असून, त्याचा प्रभाव वाढला आहे. या भागात ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहणार असून, विजांचा कडकडाट, मेघगर्जनेसह जोरदार पाऊस हजेरी लावणार आहे.

# होर्डिंगवरून एकमेकांकडे बोट!

## ‘बीआरटी’तील प्रश्न: महापालिका आणि पीएमपीएल प्रशासनाने झटकले हात

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रवाशांनो सुखरूप घरी जायचे आहे. तर मग थांबा! ‘बीआरटी’ बस थांब्यातून बाहेर पडताना आजूबाजूला धोकादायक होर्डिंग आहे का बघा. खबरदारी घ्या आणि पुढे जा... कारण, वादळी वाऱ्यासह होणाऱ्या पावसामुळे होर्डिंग पडण्याच्या घटनेत वाढ झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर, ‘बीआरटी’वर होर्डिंग नेमके कोणी लावले?, त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे का? आणि एखादी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? याबाबत महापालिका आणि पीएमपीएल प्रशासन आपली जबाबदारी झटकत असून एकमेकांकडे बोट दाखवत आहे.**







### बीआरटी मार्ग संख्या, बसथांबे

पिंपरी-चिंचवड शहरात पाच ‘बीआरटी’ मार्ग आहेत. दिघी ते आळंदी रस्ता. सांगवी ते किवळे मुकाई चौक. दापोडी ते निगडी. नाशिक फाटा ते वाकड आणि काळेवाडी फाटा ते देहूरोड यांचा त्यामध्ये समावेश होतो. या मार्गांवर सुमारे १०० ‘बीआरटी’ बसथांबे उभारण्यात आले आहेत.

### इलेक्ट्रिक जाहिरातीचे होर्डिंग

- अनेक ‘बीआरटी’वर इलेक्ट्रिक जाहिरातीचे होर्डिंग.
- जुने आरटीओ ते केएसबी चौकापर्यंत ‘बीआरटी’वर दोन्ही बाजूला होर्डिंग.
- पिंपळे सौदागर, कोकणे चौक ते नाशिक फाटापर्यंत बीआरटीवर सर्रास होर्डिंग.
- थेरगाव, काळेवाडी फाटा, सांगवी ते औंध रस्ता बीआरटी मार्गावर देखील होर्डिंग.

### काय करता येईल?

- होर्डिंगबाबत ठोस धोरण तयार करणे
- दरवर्षी किमान पावसाळ्यापूर्वी स्ट्रक्चरल ऑडिट करणे
- धोकादायक आणि कमकुवत होर्डिंग्ज खाली उतरविणे
- होर्डिंग्जचे आकारमान, स्वरूप निश्चित करणे
- अटी-शर्ती निश्चित करून त्यांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई
- नियमांची पायमल्ली वारंवार केल्यास परवानाधारकाला काळ्या यादीत टाकणे

### सध्या एकही होर्डिंग नाही?

राज्यात मोसमीपूर्व पावसाने होर्डिंग पडून अनेक दुर्घटना घडल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर प्रशासन यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. पीएमपीएल प्रशासनाच्यावतीने टेंडर काढून जाहिरात फलक उभारले जातात. पिंपरी-चिंचवडमध्ये सध्या एकही होर्डिंग उभारले नसल्याचा दावा पीएमपीएमपीएल प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

### पीएमपी महापालिकेने हात झटकले

बसथांब्याकडे ये-जा करताना होर्डिंग अंगावर पडण्याची भीती प्रवाशांना आहे. परंतु, बसथांबानजीक होर्डिंगला परवानगी द्यावी किंवा नाही याची जबाबदारी महापालिकेची असल्याचे सांगत पीएमपीएमएल प्रशासनाने हात झटकले आहेत. तर बीआरटीवर उभारलेले होर्डिंग महापालिकेचे नसल्याचे पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन सांगत आहेत. दोन्ही विभागांच्या प्रशासन यंत्रणा याबाबत हात झटकताना दिसत आहेत. त्यामुळे, बीआरटीवर होर्डिंग नेमके कोणी लावले? एखादी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

**“ नोकरीनिमित्त दररोज पिंपरी-पुणे असा प्रवास करावा लागतो. सध्या पावसाळ्यात होर्डिंग पडण्याच्या अनेक घटना बघत आहे. त्यामुळे, बसथांब्याजवळ असणारे होर्डिंग वेळेत काढून प्रवाशांना सुखरूप करणे गरजेचे आहे.**

**–अक्षय कांबळे, प्रवासी.**

**“ बसथांब्यांवर जाहिरातीचे होर्डिंग लावताना रीतसर निविदा काढली जाते. सध्या नवीन जाहिरातीची कोणतीही निविदा प्रसिद्ध केलेली नाही. त्यामुळे, पिंपरी-चिंचवड अंतर्गत येणाऱ्या पीएमपीएमएलच्या बसथांब्यावर प्रशासनाने एकही होर्डिंग उभारले नाही. बसथांबा परिसरात होर्डिंगला परवानगी देण्याची जबाबदारी महापालिका प्रशासनाची आहे.**

**– दत्तात्रेय झेंडे, मुख्य वाहतूक व्यवस्थापक (व्यावसायिक)**

**“ शहरातील बीआरटी मार्गावर उभारलेले होर्डिंग पिंपरी-चिंचवड महापालिकेचे नाहीत. पीएमपीएमएल प्रशासनाकडूनच ते होर्डिंग उभारले जातात. त्याबाबतची रीतसर प्रक्रिया करून पीएमपीएमएल प्रशासन कार्यवाही करते.**

**– बापू गायकवाड, कार्यकारी अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

---

# पिंपरी : एका वर्षात अडीच हजार श्वानांचा मृत्यू!

## नेहरूनगर येथील प्राणी शुश्रूषा केंद्रात मोठ्या प्राण्यांसाठीही दहनयंत्राची सोय

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या नेहरुनगर येथील प्राणी शुश्रूषा केंद्रात आता मोठ्या प्राण्यांसाठीही दहनयंत्राची सोय करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टळणार आहे. दरम्यान, एका वर्षात अडीच हजार श्वानांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.**



पिंपरी-नेहरूनगर येथे महापालिकेच्या वतीने शहरात प्राणी शुश्रूषा केंद्रात (ॲनिमल शेल्टर हाऊस) भटक्या आणि पाळीव प्राण्यांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्राणी शुश्रूषा केंद्राच्या माध्यमातून पाळीव, भटक्या श्वानांना उपचार दिले जातात. याच ठिकाणी श्वानांसाठी दहन यंत्र बसविण्यात आले आहे. मात्र, मोठ्या प्राण्यांसाठी अशी यंत्रणा उपलब्ध नव्हती. त्यामुळे ते प्राणी पुण्यातील दहनयंत्रामध्ये पाठविण्यात येत होते. मात्र, आता शहरातील मोठ्या प्राण्यांसाठी दहनयंत्राची सोय करण्यात आली आहे. मोठ्या पाळीव प्राण्यांसाठीचे दहन मशीन बसविण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टळणार आहे. या मशीनमध्ये दहनासाठी प्राण्यांच्या वजनानुसार वेळ लागणार आहे.

### दरमहा 40 प्राण्यांचे दहन

शहरात पाळीव प्राण्यांची संख्या लक्षणीय आहे. दर महिन्याला साधारण ३५ ते ४० मोठे प्राणी दहनासाठी येतात. त्यामुळे ही संख्या मोठी असून शहरात अद्ययावत यंत्राची आवश्यकता होती. पाळीव प्राण्यांमध्ये गाय, म्हैस, बैल, घोडा या प्राण्यांसाठीदेखील दहन यंत्र असावे, अशी नागरिकांची मागणी होती. त्यानुसार अद्ययावत आणि पर्यावरणपूरक यंत्र बसविण्यात आले आहे. हे मशीन सीएनजी गॅसवर चालते. मोठ्या पाळीव प्राण्यांसाठीचे दहन यंत्र बसविण्यात आले आहे. त्याची चाचणी सुरू आहे. येत्या काही दिवसांत मोठ्या प्राण्यांचे दहन सुरू करण्यात येणार आहे, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे यांनी सांगितले.

### एका वर्षात अडीच हजार श्वानांचे दहन

२०२३ मे ते एप्रिल २०२४ पर्यंत दोन हजार ५८० श्वानांचे दहन करण्यात आले. यामध्ये पाळीव आणि रस्त्यावरील श्वानांचा समावेश आहे. मे २०२३ मध्ये यंत्रामध्ये बिघाड झाल्याने श्वानांसाठीचे नवीन यंत्र बसविण्यात आले होते.

# हळदविधी की उधळपट्टी !




**विवाह संस्काराचा प्रारंभ मुलास हळद लावण्याने होतो. त्याची आई, बहिण व नात्यातील बायका त्याला सुगंधी तेलात भिजविलेली हळद लावतात. ह्या रंगतदार समारंभात हळदीची गाणी आणि वाजंत्री यासह मुलास समारंभपूर्वक आंघोळ घालतात.**

उर्वरित म्हणजे उष्टी हळद, साडी आणि पूजा साहित्यासह, वधूगृही नेतात. वरपक्षाकडे ज्याप्रमाणे हळदीचा कार्यक्रम झालेला असतो त्याचीच वधूकडे पुनरावृत्ती करतात. वधूला हळद लावतांना नारळ व पाच मूठभर तांदळांनी तिची समारंभपूर्वक ओटी भरतात. हळद लावल्यावर मुला-मुलीस नवरदेव-नवरी असे संबोधिले जाते. आजकाल ग्रामीण भागात होणाऱ्या लग्नांमध्ये एक नवीन विधी उदयास आला आहे, तो म्हणजे हळदी विधी. हळदी समारंभात हजारो रुपये खर्च करून विशेष सजावट केली जाते, त्या दिवशी वधू किंवा वर विशेष पिवळे कपडे घालतात. 2020 पूर्वी या हळदी विधीची प्रथा ग्रामीण भागात कुठेही दिसून येत नव्हती, मात्र गेल्या दोन-तीन वर्षात ग्रामीण भागात ही प्रथा झपाट्याने वाढली आहे. पूर्वी हळदी विधीच्या मागे कोणताही दिखावा नव्हता, उलट त्यामागे तर्क होता. पूर्वी ग्रामीण भागात आजच्यासारखे साबण आणि शॉम्पू नव्हते, ब्युटी पार्लरही नव्हते. त्यामुळे वधू-वरांच्या चेहऱ्यावरील आणि शरीरावरील मृत त्वचा आणि केस हळदीच्या



पेस्टने रगडून काढण्यासाठी आणि चेहरा मुलायम आणि चमकदार करण्यासाठी हळद, चंदन, मैदा आणि दुधापासून तयार केलेल्या पेस्टचा वापर केला जातो. जेणेकरून वधू-वर सुंदर दिसतील. या कामाची जबाबदारी कुटुंबातील महिलांची होती, पण आजकाल हळदीचा विधी बदललेला, दिखाऊ आणि महाग झाला आहे. ज्यामध्ये हजारो रुपये खर्चून सजावट केली जाते. महागडे पिवळे कपडे घातले जातात, वर वधूच्या घरी जातो आणि संपूर्ण वातावरण आणि कार्यक्रम पितांबरी करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जातो. हे पिवळे नाटक घरच्या प्रमुखांच्या कपाळावर तणावाच्या रेषा काढते, ज्यामुळे चिंताग्रस्त घामाचे थेंब पडतात. जुन्याकाळी वधू-वर कच्च्या छपराखाली कसलाही गाजावाजा न करता भक्कम इरादयाने आपले जीवन आनंदाने सुरू करायचे, पण आज भक्कम हेतू कमी आणि ढोंग आणि कृत्रिमता जास्त आहे. आजकाल ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या कुटुंबातील मुलेही या शहरी कृत्रिमतेत अडकून कुटुंबावर अतिरिक्त आर्थिक बोजा वाढवत असल्याचे दिसून येत आहे. कारण त्यांना त्यांची ताकद त्यांच्या उदार मतवादी नेत्यांना, वन साईड हेअर कटिंगवाले किंवा लांब केस असलेल्या सिगारेट ओढणारे मित्रांना आपले शोऑफ दाखवायचे असते. इन्स्टाग्राम, फेसबुक इत्यादीसाठी रील बनवायची आहे. मुलाच्या रील बनविण्याच्या नादात वडिलांची कर्ज फेडण्यातच रील ऐवजी रेल बनून जात असते. ग्रामीण भागात अशा घरांमध्ये फालतू खर्चावर पाण्यासारखा पैसा वाया जातो. ज्यांच्या आई-वडिलांनी एक-एक पैसा कमावून घराची रचना केली, पण ही तरुण मुले-मुली समजून न घेता पालकांच्या विरोधात जाऊन विनाकारण खर्च करतात. ज्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही अशा मुलांनी त्यांच्या पालकांकडे आग्रह धरू नये आणि त्यांना अनावश्यक खर्च करायला लावू नये. आजकाल अनेक ठिकाणी असेही पाहायला मिळते की ज्यांचे लग्न आहे अशी मुलं ते त्यांच्या पालकांना सांगतात की, तुम्हाला काहीच कळत नाही, तुम्हाला समज नाही, तुमची विचारसरणी तशीच जुनी अशिक्षित राहणार आहे, तुम्ही असंस्कृत आहात असे म्हणत ते आपल्या आई-वडिलांना गवांर आणि मागासलेले म्हणतात. जेव्हा जेव्हा मी असे ऐकतो तेव्हा मला विचार करण्यास भाग पाडले जाते आणि माझे पाय अस्थिर होतात. माझे तरुण आणि धाकटे बंधू-भगिनी कोणत्या दिशेने जात आहेत, याची मला खूप काळजी वाटते. अशा फालतू कर्मकांडाला आळा बसल्याच्या बातम्या वाचून आनंद होतोच, पण लोक आपल्या घरात, कुटुंबात, समाजात, गावात अशा कार्यक्रमात सहभागी होऊन, त्यांचे फोटो क्लिक करून स्टेटस पोस्ट करून आनंद घेत आहेत. उर्वरित म्हणजे उष्टी हळद, साडी आणि पूजा साहित्यासह, वधूगृही नेतात. वरपक्षाकडे ज्याप्रमाणे हळदीचा कार्यक्रम झालेला असतो त्याचीच वधूकडे पुनरावृत्ती करतात.

## संपादकीय »

### सुवर्णस्मरण!

***अणुस्फोटाची चाचणी करणारा सहावा देश म्हणून भारताची जगाला ओळख करून देणारी बुद्ध पौर्णिमा ५० वर्षांपूर्वीची... पण आपले अणुसामर्थ्य त्याआधीही वाढत होते...***

'सारे जण वाट पाहत होते, स्फोट कधी होणार याची. सकाळचे आठ वाजले; काटा हळूहळू आठच्या पुढे सरकला. पुढचा प्रत्येक क्षण तेथे उपस्थित असलेल्या ७५ शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांच्या चमूने कसा मोजला असेल, आपण कल्पनाही करू शकत नाही. अखेर ८ वाजून ५ मिनिटे झाली... 'आणि बुद्ध हसला'!' – राजस्थानातील पोखरणमध्ये भारताने केलेल्या पहिल्या अणुस्फोट चाचणीला शनिवारी, १८ मे रोजी ५० वर्षे पूर्ण होत असतानाही 'त्या' पाच मिनिटांमध्ये शास्त्रज्ञ किती तणावाखाली असतील, यासारखे भावनिक प्रश्न आपल्याला टाळता येत नाहीत... भूतकाळ आठवताना आपल्याला मानवी भावभावनांची, गुण-अवगुणांची वर्णनेच अधिक भुरळ पाडतात. मात्र, फक्त तसे केल्यास इतिहासातून धडा घेण्याचे राहूनच जाते आणि मग वर्तमानात भविष्याची पेरणी होत नाही.

एखाद्याकडे दोन म्हशी असतील तर त्यापैकी एका म्हशीवर कर लावला जाईल, असे म्हणणारे उद्या मृत व्यक्तीच्या संपत्तीवरही कर लावून ती ताब्यात घेतली जाऊ शकते, असं म्हणतील...सध्या सुरू असलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत सर्वाधिक चर्चेचा मुद्दा कोणता? एका बाजूला नरेंद्र मोदी आणि त्यांचे मित्रपक्ष आहेत.

# म्हशींवर कर लावला जाईल!

दुसऱ्या बाजूला राहुल गांधी आणि राज्याराज्यांमधल्या शक्तिशाली आणि स्वतंत्र नेत्यांनी उभे केलेले आव्हान आहे. या राज्याराज्यातील नेत्यांनी बेरोजगारी, महागाई, जातीय विभाजन, असमानता, कायद्यांचा शस्त्रासारखा वापर तसेच तपास यंत्रणांचा गैरवापर, महिलांवरील गुन्हे, भारतीय भूभागावर कब्जा करणारे चिनी सैन्य, निधीच्या वाटपातील भेदभाव आणि प्रसारमाध्यमांवर ताबा मिळवणे असे महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. मोदींनी या मुद्द्यांकडे सपशेल दुर्लक्ष केले. त्यांनी चतुराईने हे सगळे मुद्दे बाजूला केले, जसप्रीत बुमराह करतो तसे विरोधकांच्या आघाडीला क्लीन बोल्ड केलं आणि एक खरोखर प्रेरणादायी कल्पना मांडून नवीन कथ्य (नॅरेटिव्ह) मांडले ते म्हणजे – म्हशींवरील वारसा कर. 'एंटायर पोलिटिकल सायन्स'च्या इतक्या वर्षांच्या संशोधनातून तर ही कल्पना जन्माला आली नसेल ना? त्यामुळे देशभर धमाल चर्चा सुरू आहे की खरोखरच आता 'केंद्रीय अर्थमंत्री



म्हशींवर वारसा कर लावणार आहेत का?' या सगळ्या चर्चेत मलासुद्धा थोडी मोलाची भर घालायची आहे.केंद्र सरकारने अशी कर आकारणी करणे ही गोष्ट घटनात्मक असेल का, हा मूलभूत प्रश्न या सगळ्यामधून उपस्थित होणार आहे. सातव्या अनुसूचीच्या दुसऱ्या यादीमधील ५८ व्या नोंदीमध्ये 'प्राणी आणि बोटींवरील कर' असे म्हटले आहे. प्रथमदर्शनी, प्राण्यांवर कर लावण्याचा राज्य सरकारांना अधिकार आहे. याउलट, केंद्र सरकार पहिल्या सूचीच्या ८६, ८७ किंवा ८८ व्या नोंदींअंतर्गत अनुक्रमे मालमत्तेचे भांडवली मूल्य, मालमत्ता शुल्क आणि मालमत्तेचे उत्तराधिकारी यासंदर्भात कर आकारू शकते. कायदेशीर भाषेत बोलायचे तर, म्हैस हा फक्त प्राणी आहे की ती 'वारसा' म्हणून मिळते किंवा 'वारसा' असते तेव्हा ती मालमत्ता बनते? हा प्रश्न एवढा महत्त्वाचा आहे की तो सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकतो आणि त्यावर घटनापीठाच्या निर्णय आवश्यक असू शकतो.म्हशींवर कर लावला जाईल या कल्पनेचा कर्ता म्हणतो की 'तुमच्याकडे दोन म्हशी असतील तर एक काढून घेतली जाईल', याचा अर्थ असा की दोन किंवा अधिक म्हशींवर वारसा कर आकारला जाईल आणि या कराचा दर ५० टक्के असू शकतो. पण या कराचे व्यवस्थापन करणे सोपे नाही, हे लक्षात घ्या. म्हणजे एखाद्याकडे दोन म्हशी असतील तर कर वसूल करणारे कोणती म्हैस करवसुलीसाठी जमेत धरणार? हे म्हणजे तहान आणि भूक दोन्ही लागलेले असताना, पाणी आणि अन्न दोन्ही समोर असताना काय निवडायचे या कोंडीत सापडल्यामुळे काहीच न निवडता तहानभुकेने तडफडून मरण पावणाऱ्या बुरीदानच्या गाढवाच्या (वाचा: म्हैस) गोष्टीसारखेही होऊ शकते. दोन्ही म्हशीच

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आता संघालाही भाजपकडून धोका!

## महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात लोकसभा निवडणुकांचा प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. आज लोकसभेच्या पाचव्या टप्प्यातील प्रचार सभांचा अंतिम दिवस आहे. याच निमित्ताने महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी उद्धव ठाकरेंनी भाजपवर हल्लाबोल केला.**




सत्तेसाठी हे मुंबई हल्ल्यानंतर पादेशातील सर्व पक्ष संपवून भाजपच हा एकच पक्ष असेल, असे जे.पी. नड्डा म्हणाले होते. आता त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचीही गरज राहिली नाही. ज्या संस्थेने त्यांना जन्म दिला. त्याच संस्थेची आता त्यांना गरज राहिलेली नाही. आता भाजप राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही नकली स्वयंसेवक संघ म्हणतील. तसेच ते आता संघावरही बंदी घालतील. त्यामुळे आता संघालाही भाजपकडून धोका असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. देशात सरकारी यंत्रणांचा गैरवापर सुरु आहे. महाराष्ट्र, मुंबईला बदनाम करण्याचे कारस्थान होत आहे. मुंबई लुटून गुजरातला नेण्याचा डाव आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर महाराष्ट्राचे वैभव आम्ही परत आणू, येत्या चार जूनपासून अच्छे दिनची सुरुवात होईल, बेकायदा सरकार आणि अंसवैधानिक मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत पंतप्रधान स्वतःच्या हुकूमशाहीचा प्रचार करत आहेत. जो देईल साथ, त्याचा करू घात हीच भाजपची नीती आहे, असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. गद्दारांना मिळालेले खोके आता फुटले आहेत. त्यातून आता नोटा बाहेर निघत आहे. त्याचे वाटप होत आहे. याबाबतच्या तक्रारी निवडणूक आयोगाकडे करण्यात आल्या आहेत. तसेच काही जणांकडून मतदानानंतर लावण्यात येणारी शाई लावण्यात येते, म्हणजे ते मतदान करू शकणार नाही. असे प्रकार सुरू आहेत. असे प्रकार आढळल्यास त्या निवडणूक आयोगाच्या निर्देशनास आणून द्या, असे आवाहनही उद्धव ठाकरे यांनी केले. जे लोक देशभक्त शब्दांवर आक्षेप घेतात, ते हिंदू किंवा देशभक्त नाहीत का, असा सवालही त्यांनी केला. सर्व हिंदू हे देशभक्त आहे. देशभक्त हा सर्वांना सामावून घेणारा शब्द आहे. देशभक्तमध्ये देशातील सर्व जातीधर्माचे नागरिक आहेत. जे देशभक्त शब्दाला आक्षेप घेतात, ते देशद्राही आहेत, असा घणाघातही उद्धव ठाकरे यांनी केला. या पत्रकार परिषदेत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मोठा दावा केला.

महाराष्ट्रात महाविकास आघाडी मजबूत आहे. 48 पैकी कमीत कमी 46 जागा जिंकू असं वातावरण आहे. त्यांना शून्य जागा मिळतील असं मी बोलत नाही. त्यांना काही ना काही मिळेल, पण आमची आघाडी जास्तीत जास्त जागा जिंकून भाजपाला हरवेल, असा दावा खरगे यांनी केला. मोदी सरकारने इतर राज्यातही फोडाफोडीचे राजकारण केले. त्याविरोधात इंडिया आघाडी लढत आहे. मुंबईसह अनेक ठिकाणी महापालिकेच्या निवडणुका झालेल्या नाहीत, हीच मोदी यांची लोकशाही आहे काय? सर्व सरकारी यंत्रणा मोदींच्या इशाऱ्यावर चालतात. मात्र, आता निवडणुकीत तसेच होणार नाही. आता जनताच या लढ्यात उतरली आहे. त्यामुळे आता जनतेचा विजय होणार आहे, असेही मल्लिकार्जुन खरगे म्हणालेआता त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचीही गरज राहिली नाही. ज्या संस्थेने त्यांना जन्म दिला. त्याच संस्थेची आता त्यांना गरज राहिलेली नाही. आता भाजप राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही नकली स्वयंसेवक संघ म्हणतील. तसेच ते आता संघावरही बंदी घालतील. त्यामुळे आता संघालाही भाजपकडून धोका असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. देशात सरकारी यंत्रणांचा गैरवापर सुरु आहे.

### कमीत कमी 46 जागा जिंकू - खरगे

महाराष्ट्र, मुंबईला बदनाम करण्याचे कारस्थान होत आहे. मुंबई लुटून गुजरातला नेण्याचा डाव आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर महाराष्ट्राचे वैभव आम्ही परत आणू, येत्या चार जूनपासून अच्छे दिनची सुरुवात होईल, बेकायदा सरकार आणि अंसवैधानिक मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत पंतप्रधान स्वतःच्या हुकूमशाहीचा प्रचार करत आहेत. जो देईल साथ, त्याचा करू घात हीच भाजपची नीती आहे, असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. गद्दारांना मिळालेले खोके आता फुटले आहेत. त्यातून आता नोटा बाहेर निघत आहे. त्याचे वाटप होत आहे. याबाबतच्या तक्रारी निवडणूक आयोगाकडे करण्यात आल्या आहेत. तसेच काही जणांकडून मतदानानंतर लावण्यात येणारी शाई लावण्यात येते, म्हणजे ते मतदान करू शकणार नाही. असे प्रकार सुरू आहेत. असे प्रकार आढळल्यास त्या निवडणूक आयोगाच्या निर्देशनास आणून द्या, असे आवाहनही उद्धव ठाकरे यांनी केले. जे लोक देशभक्त शब्दांवर आक्षेप घेतात, ते हिंदू किंवा देशभक्त नाहीत का, असा सवालही त्यांनी केला.

---

# गडकरींच्या कुंडलीत राजकीय बहुमानाचा योग!

## मोदींच्या पंच्याहत्तरीच्या चर्चेत ज्योतिषांची मोठी भविष्यवाणी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आपल्या नंतर आपले राजकीय वारसदार आपलेच अपत्य असावे अशा पद्धतीच्या रांगा राजकारणात दिसू लागल्या आहेत. याही काळात राजकारणात मैत्री व मैत्रीत राजकारण न आणणारा अजातशत्रू म्हणून नितीन गडकरींची ओळख आहे.**

भाजपा सरकार सत्तेत आल्यापासून दोन नेत्यांची नावे सदैव चर्चेत असतात ती म्हणजे नरेंद्र मोदी आणि नितीन गडकरी. जेव्हा विरोधी पक्षातील नेत्यालाही आपल्याच विरोधातील नेता आवडायला लागतो तेव्हा खऱ्या अर्थाने राजकारणाला सुरुवात होते. राजकारणात यापूर्वी अनेक असे अजातशत्रू होऊन गेले जसे की, अटलबिहारी वाजपेयी, बाळासाहेब ठाकरे, नरसिंहराव, यशवंतराव चव्हाण इत्यादी. आता मात्र राजकारणाचा नूरच बदलला आहे.



मोदींचे निर्णय वादग्रस्त ठरू शकतात, कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जन्मतारीख १७ सप्टेंबर १९५० (१७- ०९- १९५०), या अंकांची बेरीज केल्यास १+७+९+१+९+५+०= ३२, ३+२= ५ मोदींचा भाग्यांक व मूलांक आपल्या समोर येतो. मोदींच्या जन्मतारखेनुसार त्यांचा मूलांक आहे १+ ७= ८ आणि भाग्यांक आहे ५. आता नितीन गडकरी यांची जन्मतारीख. २६- ५- १९५७. यानुसार मूलांक येतो २+ ६= ८ व भाग्यांक येतो २+ ६+५+१+९+५+७= ३५, ३ +५= ८. एकूण दोन्ही जन्मतारखांचे बळ आपापल्या परीने योग्य असले तरी गडकरींच्या जन्मतारखेत ९ हा अंक खूपच बलवान ठरतो. मोदींच्या जन्मतारखेच्या (१+७= ८) ८ या मूलांकावर शनीचे वर्चस्व असते. राज्यकारभारासाठी मंगळाचे वर्चस्व मोठे मानले जाते. देशाच्या हिताचे राजकारण जर बुद्धीच्या जोरावर केले तर त्यातून नक्कीच यश प्राप्त होते. शनीचे राजकारण हे हट्टीपणाचे व आततायीपणाचे असते अशा प्रभावाखाली घेतलेले निर्णय हे वादग्रस्त ठरू शकतात.

### गडकरींच्या संधी वाढणार!

बुध मंगळ त्रिएकादश योगातून तयार होणारा राजयोग पुढील काळातही उत्तम नेतृत्व निर्माण करेल. तसेच अडचणीच्या काळात आपल्या चतुरस्त्र डावांनी देशातील लोकशाहीला सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारून होणारा विरोध संपवून टाकेल. आश्वासने नकोत, पूर्तता करू हा त्यांचा कानमंत्र ठरेल. राजकीय आयुष्यात पुरेसे पर्याय असावेत. आंधळेपणाने केलेलं देशाचं राजकारण विनाशाकडे नेईल याची पुरेपूर जाणीव असणारी ही व्यक्ती भावी काळातील नेतृत्व घडवेल.

# तुम्ही जेल-जेलचा खेळ खेळताय!

## मोदीजी 12 वाजता भाजपा कार्यालयात भेटा : केजरीवाल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे स्वीय सहाय्यक बिभव कुमार यांच्यावर कथित मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आलाय. याप्रकरणी त्यांना आज अटक करण्यात आली. स्वाती मालिवाल यांच्या जबाबानंतर ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, बिभव कुमार यांना अटक झाल्यानंतर अरविंद केजरीवाल यांनी एक व्हिडिओ पोस्ट करून भाजपाला इशारा दिला आहे.**

आम आदमी पक्षाच्या मागे का लागले आहेत हे लोक. एकामोगामाग एकाला हे तुरुंगात टाकत आहेत. संजय सिंहांना तुरुंगात टाकलं, आज माझ्या पीएला टाकलं. आता हे म्हणतात की राघव चड्ढा यांनाही जेलमध्ये टाकणार. सौरभ, अतिशी यांनाही तुरुंगात टाकणार. मी हा विचार करतोय की हे आम्हाला तुरुंगात का टाकत आहेत. आमचा गुन्हा काय?" असा प्रश्न दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी उपस्थित केला.आमचा गुन्हा एकच की आम्ही सरकारी शाळा चांगल्या बनवल्या. आम्ही गरिबांच्या मुलांना चांगलं शिक्षण दिलं. हे लोक तसं करू शकले नाहीत. त्यामुळे दिल्लीतील सरकारी शाळा यांना बंद करायच्या आहेत. आम्ही दिल्लीकरांसाठी मोहल्ला क्लिनिक बनवले, सरकारी रुग्णालये बनवली, चांगल्या सरकारी उपचारांची सुविधा उपलब्ध करून दिली. भाजपा हे करू शकली नाही. त्यामुळे ते मोहल्ला क्लिनिक आणि सरकारी रुग्णालये बंद करू इच्छितात. पूर्वी दिल्लीत १०-१० तास वीज भारनियमन असे. आम्ही २४ तास वीज ठेवली. आम्ही दिल्लीकरांना मोफत वीज दिली. मोफत वीज देणं सोपं काम नाहीय", असंही केजरीवाल म्हणाले. मी पंतप्रधांना सांगू इच्छितो की तुम्ही जेल-जेलचा खेळ खेळताय. मी उद्या १२ वाजता आपल्या सर्व मोठ्या नेत्यांबरोबर भाजपाच्या उच्चालयात येत आहे. तुम्हाला ज्यांना ज्यांना तुरुंगात टाकायचं आहे त्यांना टाका. तुम्हाला वाटतंय की आपल्या नेत्यांना तुरुंगात टाकलं तर पक्ष संपेल. पण आप संपणाऱ्यातला नाही. आम आदमी पक्ष एक विचार आहे. आपच्या जितक्या नेत्यांना तुरुंगात टाकाल तितक्या पटीने नेते हा देश घडवतील. त्यामुळे मोदीजी उद्या ठीक १२ वाजता भाजपा



कार्यालयात भेटा!", असं आव्हान अरविंद केजरीवाल यांनी दिलं.१३ मे रोजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी मला मारहाण करण्यात आली, असा आरोप स्वाती मालिवाल यांनी केला होता. त्यांनी अरविंद केजरीवाल यांचे स्वीय साहायक बिभव कुमार यांच्यावर गंभीर आरोप केले होते. याप्रकरणी गुरुवारी दिल्ली पोलिसांच्या पथकाने स्वाती मालिवाल यांच्या घरी जाऊन त्यांचा जबाबही नोंदवला होता. त्यावेळी स्वाती मालिवाल यांनी घडलेल्या घटनेची संपूर्ण माहिती दिली होती. तत्पूर्वी राष्ट्रीय महिला आयोगाने बिभव कुमार यांना समन्स बजावले होते. यानुसार बिभव कुमार यांना १७ मे रोजी सकाळी ११ वाजता हजर राहण्याचे आदेश दिले होते. तसेच दिल्ली पोलिसांनी बिभव कुमार यांच्या विरोधात गुन्हाही दाखल केला होता.

या प्रकरणावर आम आदमी पक्षाचे नेते संजय सिंह यांनी एका पत्रकार परिषदेत पक्षाची भूमिका स्पष्ट केली होती. "ही घटना अत्यंत निंदनीय आहे. अरविंद केजरीवाल यांना भेटायला स्वाती मालिवाल गेल्या होत्या. त्या जेव्हा केजरीवाल यांची वाट बघत होत्या तेव्हा बिभव कुमार यांनी त्यांच्याशी गैरव्यवहार केला आणि कथित मारहाणही केली. या सगळ्या घटनेनंतर आता स्वाती मालिवाल यांनी दिल्ली पोलिसांना या प्रकरणात लेखी तक्रार दिली आहे. दिल्ली पोलिसांचं पथक स्वाती मालिवाल यांच्या घरी गेलं होतं तिथे त्यांचा जबाब नोंदवण्यात आला." असे ते म्हणाले होते.आम आदमी पक्षाच्या मागे का लागले आहेत हे लोक. एकामोगामाग एकाला हे तुरुंगात टाकत आहेत. संजय सिंहांना तुरुंगात टाकलं, आज माझ्या पीएला टाकलं. आता

### आम आदमी पक्ष एक विचार आहे

आम आदमी पक्ष एक विचार आहे. आपच्या जितक्या नेत्यांना तुरुंगात टाकाल तितक्या पटीने नेते हा देश घडवतील. त्यामुळे मोदीजी उद्या ठीक १२ वाजता भाजपा कार्यालयात भेटा!", असं आव्हान अरविंद केजरीवाल यांनी दिलं.१३ मे रोजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी मला मारहाण करण्यात आली, असा आरोप स्वाती मालिवाल यांनी केला होता. त्यांनी अरविंद केजरीवाल यांचे स्वीय साहायक बिभव कुमार यांच्यावर गंभीर आरोप केले होते. याप्रकरणी गुरुवारी दिल्ली पोलिसांच्या पथकाने स्वाती मालिवाल यांच्या घरी जाऊन त्यांचा जबाबही नोंदवला होता. त्यावेळी स्वाती मालिवाल यांनी घडलेल्या घटनेची संपूर्ण माहिती दिली होती.

हे म्हणतात की राघव चड्ढा यांनाही जेलमध्ये टाकणार. सौरभ, अतिशी यांनाही तुरुंगात टाकणार. मी हा विचार करतोय की हे आम्हाला तुरुंगात का टाकत आहेत. आमचा गुन्हा काय?" असा प्रश्न दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी उपस्थित केला.आमचा गुन्हा एकच की आम्ही सरकारी शाळा चांगल्या बनवल्या. आम्ही गरिबांच्या मुलांना चांगलं शिक्षण दिलं. हे लोक तसं करू शकले नाहीत. त्यामुळे दिल्लीतील सरकारी शाळा यांना बंद करायच्या आहेत. आम्ही दिल्लीकरांसाठी मोहल्ला क्लिनिक बनवले, सरकारी रुग्णालये बनवली, चांगल्या सरकारी उपचारांची सुविधा उपलब्ध करून दिली. भाजपा हे करू शकली नाही. त्यामुळे ते मोहल्ला क्लिनिक आणि सरकारी रुग्णालये बंद करू इच्छितात. पूर्वी दिल्लीत १०-१० तास वीज भारनियमन असे. आम्ही २४ तास वीज ठेवली. आम्ही दिल्लीकरांना मोफत वीज दिली. मोफत वीज देणं सोपं काम नाहीय", असंही केजरीवाल म्हणाले. मी पंतप्रधांना सांगू इच्छितो की तुम्ही जेल-जेलचा खेळ खेळताय. मी उद्या १२ वाजता आपल्या सर्व मोठ्या नेत्यांबरोबर भाजपाच्या उच्चालयात येत आहे. तुम्हाला ज्यांना ज्यांना तुरुंगात टाकायचं आहे त्यांना टाका. तुम्हाला वाटतंय की आपल्या नेत्यांना तुरुंगात टाकलं तर पक्ष संपेल. पण आप संपणाऱ्यातला नाही.

# केंद्रीय पेन्शनधारकांचा महागाई भत्ता वाढणार!

## जुलैच्या आधी महागाई भत्ता दर 54 टक्क्यांवर पोहोचणार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांचा महागाई भत्त्यात वाढ होण्याची शक्यता आहे. जुलैच्या आधी महागाई भत्ता दर 54 टक्क्यांवर पोहोचणार आहे. सध्या केंद्रीय कर्मचाऱ्यांना 50 टक्के दराने महागाई भत्ता म्हणजेच डीए मिळतोय. महागाई भत्त्याचा दर 50 टक्क्यांहून अधिक झाल्यावर सरकार आठव्या वेतन आयोगासंदर्भात गांभीर्याने विचार करेल असा नियम सांगतो.**

पण आतापर्यंत यासंदर्भात कोणती घोषणा झाली नाही. केंद्रीय कर्मचाऱ्यांचा डीए सध्या 50 टक्के आहे. यामध्ये 1 जुलैपासून 4 टक्के वाढ होईल. महागाई तर दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. एखाद्या महिन्यात काही पॉइंट्सचे अंतर येते. पण जानेवारी 2024 पासून 30 जून 2024 चा चार्ट पाहिला तर त्या आधारे डीए किमान 4 टक्के वाढेल असा विश्वास स्टाफ साइडच्या राष्ट्रीय परिषदेचे सदस्य सी. श्रीकुमार यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी आठव्या वेतन आयोगाच्या समितीसंदर्भात महत्वाचे विधान केले. भारत पेन्शनर समाज म्हणजेच बीपीएसने 8 व्या वेतन आयोगाच्या समितीची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर



सातव्या वेतन आयोगाच्या आधारे पगार आणि भत्त्यांमध्ये संशोधनाला अनुमोदन दिले गेले. दरम्यान केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या वेतन आयोगाच्या समितीवर कोणता विचार केला नाही. सरकारकडे असा कोणता प्रस्तावदेखील विचारधीन नाही, असे अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी सांगितले. 68 व्या एजीएमदरम्यान आठव्या वेतन आयोगासाठी समिती स्थापन करावी, असा एक प्रस्ताव संमत करण्यात आला. आठव्या वेतन आयोगाच्या समितीसंदर्भात कर्मचाऱ्यांकडून केंद्र सरकारला सूचना पाठवण्यात येत आहेत, असे बीपीएसचे महासचिव एससी महेश्वरी यांनी सांगितले होते. इंडियन रेल्वे टेक्निकल


### कर्मचाऱ्यांचा डीए सध्या 50 टक्के

आतापर्यंत यासंदर्भात कोणती घोषणा झाली नाही. केंद्रीय कर्मचाऱ्यांचा डीए सध्या 50 टक्के आहे. यामध्ये 1 जुलैपासून 4 टक्के वाढ होईल. महागाई तर दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. एखाद्या महिन्यात काही पॉइंट्सचे अंतर येते. पण जानेवारी 2024 पासून 30 जून 2024 चा चार्ट पाहिला तर त्या आधारे डीए किमान 4 टक्के वाढेल असा विश्वास स्टाफ साइडच्या राष्ट्रीय परिषदेचे सदस्य सी. श्रीकुमार यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी आठव्या वेतन आयोगाच्या समितीसंदर्भात महत्वाचे विधान केले. भारत पेन्शनर समाज म्हणजेच बीपीएसने 8 व्या वेतन आयोगाच्या समितीची मागणी केली होती.

सुपरवायझर असोसिएशन म्हणजेच आयआरटीएसएसने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्याकडे आठवा वेतन आयोग समितीची स्थापना करण्याची मागणी केली. यावेळी त्यांना माजी वेतन आयोगाने केलेल्या शिफारसींचा दाखला देण्यात आला. दरम्यान लोकसभा निवडणुकीचे निकाल आल्यानंतर केंद्र सरकारसमोर आठव्या वेतन आयोगाच्या समितीची मागणी केली जाईल.

# नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला

कुणाल खेमू दिग्दर्शित 'मडगांव एक्सप्रेस' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करताना दिसत आहे. या चित्रपटाचं कौतुक देखील होत आहे. या चित्रपटात दिव्येंदू शर्मा, प्रतिक गांधी, अविनाश तिवारी, उपेंद्र लिमये, छाया कदम हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत पाहायला मिळत आहेत. याशिवाय या चित्रपटात ग्लॅमरस डान्सर, अभिनेत्री नोरा फतेही झळकली आहे. या चित्रपटामुळे सध्या नोरा चर्चेत आली आहे. 'मडगांव एक्सप्रेस' या चित्रपटाच्या निमित्ताने दिव्येंदू, अविनाश आणि नोरा नुकतेच 'मॅशबल इंडियन' या युट्यूब चॅनलच्या 'द बॉम्ब जर्नी' या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला. ती म्हणाली, "जेव्हा मी भारतात पहिल्यांदा आली तेव्हा माझ्या जवळ ५ हजार रुपये होते. यावेळेस मला १०० डॉलर म्हणजे किती असतात हे अजिबात माहित नव्हतं. मी एका अपार्टमेंटमध्ये राहत होते. थ्री-बीएचके घर होतं. प्रत्येक रुममध्ये तीन मुली राहत होत्या, अशा एकूण नऊ वेड्या मुलींबरोबर मी राहत होते. हे माझ्यासाठी ट्रॉमा पेक्षा काही कमी नव्हतं. कधी कधी मला असं वाटायचं की, माझा भारतात येण्याचा निर्णय योग्य होता की चुकीचा होता."पुढे नोरा म्हणाली, "संघर्षाच्या काळात

माझ्याकडे खूप कमी पैसे होते. त्यामुळे मी फक्त अंडी आणि ब्रेड खाऊन दिवस काढले. माझ्या घराचं भाडं मी ज्या एजन्सीत काम करत होती तेच देत होते. पण माझ्या पगारातून घराचं भाडं कापलं जात होतं. त्यामुळे माझ्या हातात येणारा पगार खूप कमी होता. त्या पगारात मुंबई सारख्या शहरात राहणं खूप कठीण आहे."याआधी नोरा तिच्या संघर्षाविषयी अनेकदा बोलली होती. २०१९मध्ये एका मुलाखतीमध्ये ती म्हणाली होती, "संघर्षाच्या काळात ज्या एजन्सीत काम केलं ते आठवड्याचे फक्त तीन हजार रुपये देत होती. त्यामुळे संपूर्ण घर खर्च करून आठवड्याच्या शेवटी हातात पैसे नसायचे."दरम्यान, नोरा ही ३२ वर्षांची आहे. या वयात ती बॉलीवूडच्या आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. नोराने टेलिव्हिजनवरील अनेक डान्स रिॲलिटी शोचे परीक्षण केलं होतं. याशिवाय ती 'स्त्री', 'बाटला हाउस', 'बाहुबली द बिगनिंग', 'फ्रॅंक' यांसारख्या चित्रपटात झळकली आहे.

## अदाने नेसली चक्क 15 रुपयांची साडी

'द केरला स्टोरी' चित्रपटातील जबरदस्त अभिनयामुळे अभिनेत्री अदा शर्मा चर्चेत आली. या चित्रपटासाठी अदाला अनेक पुरस्कारदेखील जाहीर झाले आहेत. अदा अभिनयासह आपल्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टीही चाहत्यांबरोबर शेअर करत असते. अनेकदा अदाने तिच्या नानीचा म्हणजेच आजीचा उल्लेख केला आहे. 'गुलाबी साडी' या मराठमोळ्या गाण्यावर नात अदा आणि तिच्या आजीचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला होता. अशातच अदाचा आजीशी कनेक्ट असणारा अजून एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आज अदाने खास तिच्या आजीची साडी नेसली होती. आजीची साडी नेसायची अदाची ही काही पहिलीच वेळ नाही. पण, विशेष गोष्ट म्हणजे या साडीची किंमत फक्त १५ रुपये आहे असं ती म्हणाली.

## सोनम ड्रेसमुळे झाली ट्रोल

सोनम कपूर ही फॅशन आयकॉन, फॅशन दिवा या नावांनी इंडस्ट्रीमध्ये प्रचलित आहे. अभिनयाबरोबरच ती आपल्या वेगवेगळ्या लूक्समुळे सतत चर्चेत असते. सोनमनं नुकतीच तिच्या बुक लॉंचला हजेरी लावली होती. या लॉंच सोहळ्याला सोनमने काळ्या रंगाचा ड्रेस घातला होता. तिच्या या लूकचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.सोनमच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत तिला ट्रोल केलं आहे. एकानं कमेंट करीत लिहिलं, "दारा सिंगसारखी दिसतेय." तर, "ही नाईट ड्रेसवर का फिरतेय." असं दुसऱ्या नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं. "हिचा ड्रेसिंग सेन्स कुठे गेला", असंही एकानं विचारलं. "सोनमनं उशांची कव्हर्स घातली आहेत, असं वाटतंय. जर कोणती गोष्ट सध्या ट्रेंडमध्ये किंवा फॅशनमध्ये असली तरी ती प्रत्येकाला शोभून दिसेल असं नसतंबॉलीवूडमधली फ्लॉप अभिनेत्री" असं एका युजरने लिहिलं. "यापेक्षा वाईट ड्रेस मी आजपर्यंत बघितला नाही.", "चालता फिरता हँगर", "ती हँगरमधून ड्रेस काढायला विसरली" अशा प्रकारच्या ट्रोल्स करणाऱ्या कमेंट्स सोनम कपूरच्या व्हिडीओवर करण्यात आल्यात.



## इंडस्ट्रीतला आऊटसायडर ते आम आदमीचा हिरो!

घरी चित्रपटाशी संबंधित कुणीही नाही, मूळ गाव मुंबानगरीपासून हजारो किलोमीटर दूर हिमाचल प्रदेशात, अल्फा मेल अर्थात पौरुष अवतारी प्रतिमा नाही, सिक्स पॅक ॲब्स नाहीत. चित्तथरारक स्टंट केल्यानंतर ललनांच्या गराड्यात वगैरेही नाही. हिंदी मालिका आणि टीव्ही सृष्टीच्या हिरोच्या पारंपरिक प्रतिमेला छेद देत पडद्यावर आम आदमी साकारुन त्यालाच नायकत्व देणाऱ्या विक्रांतचा आज वाढदिवस. टीव्ही मालिकांमध्ये काम करू लागल्यानंतर मंडळी तिथेच स्थिरावतात. पण विक्रांतने टीव्ही ते चित्रपट असं स्थित्यंतर केलं. सुरुवातीला पदरी पडलेल्या छोट्या भूमिका चोख निभावत विक्रांतने वाटचाल सुरू ठेवली. 12TH FAIL निमित्ताने विक्रांतला हिरो करणारी कहाणी पडद्यावर आली. चंबळसारख्या दुर्गम भागातून सुरुवात करून थेट प्रशासकीय अधिकारी झालेल्या मनोज शर्मा यांची कारकीर्द विक्रांतने सुरेख साकारली. याचा प्रत्यय चाहत्यांच्या प्रतिक्रिया, पुरस्कार आणि सोशल मीडियावर वाढते फॉलोअर्स यातून सिद्ध होताना दिसत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने विक्रांतच्या सफरीचा घेतलेला धांडोळा. विक्रांतचं कुटुंब मूळचं हिमाचल प्रदेशमधील शिमल्याचं. त्याच्या वडिलांचं नाव जॉली आणि आईचं नाव आमना आहे. त्याला मोईन नावाचा मोठा भाऊ आहे. त्याच्या वडिलांचं कुटुंब ख्रिश्चन धर्म पाळतं, तर त्याच्या आईचं कुटुंब शीख आहे. विक्रांतच्या आई-बाबांनी पळून जाऊन लग्न केलं होतं, नंतर ते काही काळ विदर्भातील नागभीड इथं राहत होते.

## तापसी पन्नूच्या सिक्रेट लग्नातील पहिला व्हिडीओ

बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नू गेल्या काही दिवसांपासून तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. जवळच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत तिने बॉयफ्रेंड मॅथियस बोशी लग्न केल्याचं वृत्त काही दिवसांपूर्वी समोर आलं होतं. परंतु, यावर तापसीने कुठेही अधिकृतपणे भाष्य केलं नव्हतं. यामुळे नेमकं तिचं लग्न झालंय की नाही? याबाबत साशंकता निर्माण झाली होती. अशातच तिच्या लग्नातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने तापसी लग्नबंधनात अडकल्याचं अखेर स्पष्ट झालं आहे.जवळच्या मित्रमंडळींच्या उपस्थितीमध्ये तापसी राजस्थानमधील उदयपूरमध्ये विवाहबंधनात अडकली आहे. वरमाला विधीसाठी अभिनेत्रीने लग्नमंडपात थाटामाटात एन्ट्री घेतली होती. लाल रंगाचा भरजरी पंजाबी ड्रेस, डोळ्यावर गॉगल, हातात लग्नाचा चुडा अशा खास अंदाजात तापसी मंडपात आली होती.तापसी पन्नूने लग्नसमारंभात पंजाबी गाण्यावर एन्ट्री घेतल्याचं पाहायला मिळालं. नववधूच्या रुपात ती अतिशय सुंदर दिसत होती. तसेच मॅथियस बोने देखील यावेळी पारंपरिक लूक केला होता. एकमेकांना वरमाला घातल्यावर या जोडप्यावर सगळ्यांनी फुलांची उधळण केली. तापसीच्या लग्नातील हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर सर्वत्र व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांनी अभिनेत्रीवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, अजूनही तापसीने लग्नाबाबत कोणतंही स्पष्टीकरण दिलेलं नाही. दरम्यान, तापसी माजी बॅडमिंटनपटू मॅथियस बोबरोबर जवळपास दहा वर्षांपासून रिलेशनशिप होती. आता या जोडप्याने लग्न केलं आहे. अनुराग कश्यप आणि कनिका ढिल्लों हे दोघे तिच्या लग्नाला उपस्थित होते.



# यश ठरला आरसीबीचा तारणहार!

## आरसीबीने जबरदस्त कामगिरी करत चेन्नईला पराभूत केले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने अष्टपैलू कामगिरी करत प्लेऑफमध्ये धडक मारली आहे. प्लेऑफमध्ये धडक मारणारा आरसीबी चौथा संघ ठरला आहे. यश दयाल आरसीबीसाठी तारणहार ठरला. त्याच्या २०व्या षटकातील उत्कृष्ट गोलंदाजीने संघाला विजय मिळवून दिला. बलाढ्य चेन्नईचा २७ धावांनी पराभव करत आऱसीबीने मोठा विजय मिळवला आहे. सुरूवातीच्या सामन्यांमध्ये पराभवांची रांग लावल्याने संघाच्या कामगिरीवर टिका झाली. पण त्यानंतर आऱसीबीने संघ संयोजनात बदल करत एकापेक्षा एक विजय मिळवले आणि प्लेऑफसाठी आपला दावा ठोकला. फक्त दावाच नाही तर सर्व संघांना मागे टाकत प्लेऑफमध्ये धडक मारली आहे.**



फाफ डू प्लेसिसच्या संघाचा हा सलग सहावा विजय आहे. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने ५ गड्यांच्या मोबदल्यात २१८ धावा केल्या. प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी चेन्नईला २०० किंवा त्यापेक्षा कमी धावसंख्येवर रोखावे लागले. सर्व प्रयत्नांनंतरही चेन्नईचा संघ ७ गड्यांच्या मोबदल्यात १९१ धावाच करू शकला.यश दयालला सामन्यातील २०वे आणि महत्त्वाचे षटक टाकण्याची संधी दिली. त्या सामन्यात चेन्नईला विजयासाठी ६ चेंडूत ६ धावांची गरज होती. यशच्या पहिल्या चेंडूवर धोनीने मोठा षटकार लगावला आणि सर्वांनाच रिंकूचे षटकार आठवले. पण यश दयालने पुढच्याच चेंडूवर धोनीला थेट झेलबाद केलं आणि आऱसीबीला सामन्यात परत आणले. त्यानंतर तिसरा चेंडू निर्धाव गेला. त्यानंतर ३ चेंडूत ११ धावा हव्या होत्या. चौथ्या चेंडूवर ठाकूरने १ धाव घेत जडेजाला स्ट्राईक दिली. यानंतर २ चेंडूत १० धावांची गरज होती. यानंतर पाचवा चेंडूही डॉट बॉल आणि इथेच आऱसीबीने सेलिब्रेट करायला सुरुवात केली. तर सहावा चेंडूही डॉट बॉल राहिला आणि आऱसीबीने विजय मिळवला. . विराट कोहलीच्या डोळ्यात तर आनंदाश्रू तरळताना दिसले. चेन्नईची सुरुवात खूपच खराब झाली आणि कर्णधार ऋतुराज गायकवाड डावाच्या पहिल्याच चेंडूवर ग्लेन मॅक्सवेलचा बळी ठरला. डॅरिल मिशेललाही केवळ ४ धावा करता आल्या. १९ धावांवर दोन विकेट पडल्यानंतर रचिन रवींद्र आणि अजिंक्य रहाणे यांनी डावाची धुरा सांभाळली. दोघांनीही चांगले फटके खेळले आणि तिसऱ्या विकेटसाठी ६६ धावांची भागीदारी केली. २२चेंडूत ३३ धावा करून रहाणे फर्ग्युसनचा बळी ठरला. यानंतर शिवम दुबे फार काही करू शकला नाही आणि स्वस्तात बाद झाला. दरम्यान, रचिन रवींद्रने आपले अर्धशतक पूर्ण केले. रचिन चांगल्या फॉर्मात दिसत होता, पण दुबेसोबतच्या खराब समन्वयामुळे त्याला धावबाद व्हावे लागले. दुबे स्वतःही पुढच्या षटकात बाद झाला. ग्रीनचा बळी ठरलेल्या शिवम दुबेने १५ चेंडूत ७ धावा केल्या. फॅफने अप्रतिम झेल घेत सँटनरला माघारी पाठवले. तो बाद झाला तेव्हा चेन्नईची धावसंख्या १५ षटकांत ६ बाद १२९ धावा होती. येथून रवींद्र जडेजा आणि महेंद्रसिंग धोनीने डाव पुढे नेला. चेन्नईला शेवटच्या षटकात १७ धावांची गरज होती. यश दयालच्या पहिल्याच चेंडूवर धोनीने षटकार ठोकला. पण दुसऱ्याच चेंडूवर तो बाद झाला. दयालने पुढच्या चार चेंडूंवर केवळ एक धाव दिली आणि आपल्या संघाला प्लेऑफमध्ये नेले.कर्णधार फाफ डुप्लेसिसच्या नेतृत्वाखाली आघाडीच्या फळीतील चमकदार कामगिरीमुळे आरसीबीला मजबूत धावसंख्या गाठण्यात यश आले. डुप्लेसिसने ५४ धावांच्या खेळीत ३९ चेंडूंचा सामना केला आणि तीन चौकारांसह तीन षटकारही ठोकले. त्यांच्याशिवाय विराट कोहलीने २९ चेंडूत ४७ धावा केल्या तर रजत पाटीदारने २३ चेंडूत ४१ धावा केल्या.

### कोहलीच्या डोळ्यात आनंदाश्रू

कॅमेरून ग्रीन, दिनेश कार्तिक आणि ग्लेन मॅक्सवेल यांनीही २०० पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने धावा केल्या.फाफ डू प्लेसिसच्या संघाचा हा सलग सहावा विजय आहे. प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने ५ गड्यांच्या मोबदल्यात २१८ धावा केल्या. प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी चेन्नईला २०० किंवा त्यापेक्षा कमी धावसंख्येवर रोखावे लागले. सर्व प्रयत्नांनंतरही चेन्नईचा संघ ७ गड्यांच्या मोबदल्यात १९१ धावाच करू शकला.यश दयालला सामन्यातील २०वे आणि महत्त्वाचे षटक टाकण्याची संधी दिली. त्या सामन्यात चेन्नईला विजयासाठी ६ चेंडूत ६ धावांची गरज होती. यशच्या पहिल्या चेंडूवर धोनीने मोठा षटकार लगावला आणि सर्वांनाच रिंकूचे षटकार आठवले. पण यश दयालने पुढच्याच चेंडूवर धोनीला थेट झेलबाद केलं आणि आऱसीबीला सामन्यात परत आणले.

# फॅफ डू प्लेसिस खरंच आऊट होता का?

## तिसऱ्या पंचांनी रनआऊट देताच विराटसह चाहतेही खवळले

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल २०२४ चा ६८वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात अटीतटीचा सामना सुरू आहे. या सामन्यात आरसीबीचा कर्णधार फाफ डुप्लेसिसला बाद करण्याच्या पद्धतीवर बराच गदारोळ सुरू आहे. डुप्लेसिस ज्या प्रकारे बाद झाला, त्यामुळे या हंगामात केलेल्या अंपायरिंगवर पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित होत आहेत. काय आहे हे संपूर्ण प्रकरण जाणून घेऊया.**



मिचेल सँटनर आरसीबीच्या डावातील १३वे षटक टाकत होता. षटकातील शेवटच्या चेंडूवर रजत पाटीदार स्ट्राईकवर होता. पाटीदारने सँटनेरच्या दिशेने सरळ शॉट खेळला. चेंडू सँटनरच्या हाताला लागला आणि नॉन-स्ट्रायकरच्या स्टंपला लागला. नॉन स्ट्रायकर एंडला उभ्या असलेल्या फॅफ डुप्लेसिसने वेळीच बॅट क्रीझवर आणली. मात्र तिसऱ्या पंचानी तपासले असता डुप्लेसिसची बॅट हवेत असल्याचे जाणवले आणि त्याने खेळाडूला आऊट दिले.डुप्लेसिस आणि संघाच्या प्रतिक्रियेवरून बॅट तर पूर्णपणे जमिनीवरच असल्याचे दिसून आले. फॅफला अशारितीने बाद दिल्यानंतर सध्या चांगलाच गोंधळ उडाला आहे. पण त्याची बॅट हवेत आहे की नाही हे व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसत नव्हते. बाद झाल्यानंतर फाफ डू प्लेसिस निराश दिसत होता, बाद कसं दिलं हेच त्याला कळेना. यानंतर डगआऊटमध्ये बसलेला विराट कोहलीही आश्चर्यचकित दिसला. जणू काही तो हात वर करून पंचांच्या निर्णयावर निराशा व्यक्त करत होता. तर चाहत्यांच्याही विविध प्रतिक्रिया यावर येत आहेत.आरसीबीच्या कर्णधाराने महत्त्वाच्या सामन्यात आपल्या संघासाठी कर्णधारपदाला साजेशी खेळी खेळली. १३८ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना त्याने ३९ चेंडूंचा सामना करत ५४ धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत ३ चौकार आणि ३ षटकार मारले. प्रथम फलंदाजी करताना RCB संघाने २१८ धावांची डोंगराएवढी धावसंख्या उभारली. फाफ डू प्लेसिस आणि विराट कोहलीने संघाला दमदार सुरुवात करून दिली. कोहलीला आपले अर्धशतक पूर्ण करता आले नाही आणि तो ४७ धावा करून बाद झाला. कर्णधार डू प्लेसिसने ५४ धावांचे योगदान दिले. रजत पाटीदारने २३ चेंडूत ४१ धावा केल्या.

### शार्दुलने सर्वाधिक 2 विकेट घेतले

कॅमेरून ग्रीन शेवटपर्यंत नाबाद राहिला आणि त्याने ३८ धावा केल्या. सीएसकेकडून शार्दुल ठाकूरने सर्वाधिक २ विकेट घेतले. मिचेल सँटनर आणि तुषार देशपांडे यांनी १-१ विकेट घेतली.मिचेल सँटनर आरसीबीच्या डावातील १३वे षटक टाकत होता. षटकातील शेवटच्या चेंडूवर रजत पाटीदार स्ट्राईकवर होता. पाटीदारने सँटनेरच्या दिशेने सरळ शॉट खेळला. चेंडू सँटनरच्या हाताला लागला आणि नॉन-स्ट्रायकरच्या स्टंपला लागला. नॉन स्ट्रायकर एंडला उभ्या असलेल्या फॅफ डुप्लेसिसने वेळीच बॅट क्रीझवर आणली. मात्र तिसऱ्या पंचानी तपासले असता डुप्लेसिसची बॅट हवेत असल्याचे जाणवले आणि त्याने खेळाडूला आऊट दिले.डुप्लेसिस आणि संघाच्या प्रतिक्रियेवरून बॅट तर पूर्णपणे जमिनीवरच असल्याचे दिसून आले.